नियमीत फौजदारी खटला क्र. **७३/२०२३**
निशाणी क्र. **२४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सचिन सिताराम कवळे** |
| वय सुमारे | : | ३२ वर्षे, व्यवसाय : पाणी बॉटल सप्लाय |
| निवासस्थान | : | पदहूर, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>** :

पाणी सप्लाय करण्याचा व्यवसाय हा माझा स्वत:चा आहे व तो मी मागील सहा वर्षांपासून करतो. पाणी बॉटल विक्री मी स्वत: करतो. तो व्यवसाय मी 'श्री समर्थ एन्टरप्रायजेस' या नावाने करतो.

०२. दि. १२/०१/२०२३ रोजी मी पाणी बॉटल सप्लाय करण्यासाठी चोंढी परिसरामध्ये गेलो होतो. तेव्हा मला एका अज्ञात महिलेचा फोन आला. त्यांनी सांगितले की, आमच्या नेहमी अलिबाग येथे मिटींग्ज् होत असतात तेव्हा पाणी लागणार आहे. त्यासंबंधात मला तुमची भेट घ्यायची आहे. त्यांनी व्हॉटस्ॲपद्वारे माझ्याशी संपर्क केला. सदर महिला ही मुंबई येथून संपर्क साधत होती. तिचे नाव धनश्री शशिकांत टावरे असे होते. त्यांनी मला सांगितले की, पाणी बॉटल सप्लाय करण्यासाठी तुम्ही मुंबई येथे येवू शकता का? मी त्यांना सांगितले की, मी मुंबई येथे येवू शकत नाही. त्यावर त्यांनी सांगितले की, मी तुम्हाला भेटण्यासाठी मांडवा येथे येते.

०३. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ३.३० वाजता ठरल्याप्रमाणे त्यांनी मला

मांडवा येथे त्यांना घेण्यासाठी बोलावले. मी माझी मोटरसायकल घेवून त्यांना मांडवा येथून नवखार येथे अजित मोकल चालवत असलेल्या कॉटेजवर घेवून गेलो. तेथे आमच्या गप्पागोष्टी होवून आमचे शारीरीक संबंध झाले. त्यानंतर मी त्यांना ५.३० च्या दरम्यान मांडवा येथे परत सोडले. त्यानंतर मी मांडवा येथून परत येत असताना आवास फाटा येथे आल्यानंतर संजय सावंत यांचा मला फोन आला. तो म्हणाला की, तू आणि धनश्री यांच्यात झालेले संबंधांबाबत शशिकांत टावरे यांना समजलेले आहे. तर तू तेथून तलवडे येथे ये, आपण त्यावर काहीतरी सोल्यूशन काढू.

०४. मी तलवडे गावात गेलो असता त्यांनी सांगितले की, धनश्री माझ्या ओळखीची आहे, मी हा विषय येथेच संपवू शकतो त्यासाठी तू मला १० लाख रुपये दे. मी त्यांना सांगितले की माझ्याकडे एवढे पैसे नाहीत. तो म्हणाला, तुझा आताच जमिनीचा व्यवहार झालेला आहे त्याचे ७ लाख रुपये आहेत ते पैसे तू दे. मी बाजूच्याच गावातील माणसासोबत तो व्यवहार केला त्यामुळे त्याला समजले होते. त्याने सांगितले की, जर तू मला पैसे दिले नाहीस तर शशिकांत टावरे व त्यांची माणसे तुला जिवे ठार मारतील.

०५. संजय सावंत याने मला फोन क्र. ७०८३३८१०७७ वरुन फोन केला होता. मी त्यांना सांगितले की, २—३ दिवसांत पैसे जमा करुन देतो. त्यानंतर त्याने माझा मोबाईल त्यांच्या ताब्यात घेतला. धनश्री यांनी माझ्यासोबत जी व्हॉटस्ॲप चॅटींग केली होती ती पूर्ण डिलीट केली. त्यानंतर त्यांनी मला पैसे घेवून येण्यासाठी वारंवार फोन केले. मी त्यानंतर दि. १६/०१/२०२३ रोजी मी ७ लाख रुपये कॅश दुपारी १.३० ते १.४५ वाजताच्या दरम्यान संजय सावंत यांच्या हातात दिली. मी ती कॅश एस्.बी.आय्., शाखा अलिबाग येथून काढली होती.

०६. त्याने मला सांगितले की, हा विषय इथेच संपला, तू कोणाला सांगू नको. त्यानंतर दि. १४/०२/२०२३ रोजी मला व्हॉटस्ॲप व वादळवारा न्यूजवर बातमी समजली की संजय सावंत व धनश्री टावरे यांनी माझ्यासारख्या अनेक लोकांची फसवणुक केलेली आहे. हे समजल्यावर मी मांडवा पोलीस ठाण्यात गेलो व माझी फिर्याद दाखल केली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—१ (निशाणी क्र. २५)** देण्यात येते. आता मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—२ (निशाणी क्र. २६)** देण्यात येते.

०७. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला पुन्हा ज्या ठिकाणी मी संजय सावंत यांना पैसे दिले होते त्या ठिकाणी बोलावले होते. मी पोलीसांना ते ठिकाण दाखवले होते. पोलीसांनी त्या ठिकाणचे फोटो काढले व पंचनामा केला. आज संजय सावंत न्यायालयात हजर नाही. त्याच्या गैरहजेरीचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. २ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**आरोपींतर्फे निशाणी क्र. २७ कडील अर्जावरील आदेशावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला**.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्रीमती ए. ए. मोरे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

०८. हे म्हणणे खरे आहे की, 'श्री समर्थ एन्टरप्रायजेस' हा माझा स्वत: पाण्याचा प्लॅन्ट नाही. मी सर्व प्रकारच्या कंपनीच्या सिलबंद पाण्याच्या बॉटल सप्लाय करत होतो. माझे परहुरपाडा येथे गोडावून आहे. मी रियल इस्टेट एंजट म्हणून काम करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाणी पुरवठा करणे हा माझा एकमेव व्यवसाय आहे.

०९. हे म्हणणे खरे आहे की, परहुरपाडा येथील मला देण्यात आलेला प्लॉट हा गावठाण आहे. तो प्लॉट माझ्या मालकीचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॉटचे खरेदीखत होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो प्लॉट कोणाच्या नावावर चढवता येत नाही. साक्षीदार सांगतो की, नोटरी होते. हे मला माहिती नाही की, नोटरीद्वारे कोणत्याही मालमत्तेची मालकी बदलता येत नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने मला फोन केला होता त्यावेळी त्यांना माझा नंबर कोणी दिला होता हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ला मी ओळखत नव्हतो. मी आरोपी क्र. २ कडे मिटींग संदर्भात चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मिटींगसाठी किती पाणी बॉटल लागतील याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, एक बॉक्स लागत असेल तर त्याची डेलीव्हरी अलिबागच्या बाहेर करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, १० ते १२ बॉक्स लागत असतील तर मी स्वत: जावून डेलीव्हरी करतो.

११. मला १२ तारखेला जो फोन आला होता त्यावेळी त्या महिलेशी

माझे दोन मिनिटे बोलणे झाले. १२ तारखेला त्याच दिवशी रात्री माझे आरोपी क्र. २ शी पुन्हा बोलणे झाले. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२/०१/२०२३ रोजी मी मुंबईला येणार नाही म्हणून नकार दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी नकार दिल्यानंतर त्यांनी मला पुन्हा फोन केला नाही. दि. १३/०१/२०२३ रोजी ती महिला ४:०० ते ४:१५ वाजता मांडवा जेट्टी येथे आली. मांडवा जेट्टी ते नवखार यातील अंतर ५ ते ६ कि.मी. आहे. मांडवा जेट्टी येथे महिला भेटली त्यावेळी आमच्यात पाण्याच्या बॉटलसंदर्भात बोलणे झाले होते. मांडवा जेट्टीवरुन आम्ही पाच मिनिटांनी बाहेर पडलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मांडवा जेट्टी येथे बोट ४:३० वाजता येते व तेथून पार्कींगसाठी पाच मिनिटे लागतात. मांडवा जेट्टीवर आम्ही ४:४५ वाजेपर्यंत होतो.

१२. माझा कोणताही क्लाएंट मला भेटण्यासाठी आल्यावर मी त्याला त्याच लॉजवर नेत नाही. त्या लॉजवर एन्ट्री केली नव्हती. मी ज्या दिवशी तेथे गेलो त्या दिवशी लॉजचा मालक अजित मोकल तेथे नव्हता. मी तेथे जाताना अजित मोकल याला फोन केला होता.

१३. सात लाख रुपये कोणत्या चेक क्रमांकाने आले हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, संजय सावंत याला मी आधीपासून ओळखतो. संजय सावंत व मी आजूबाजूच्या गावात राहतो. जागेचा व्यवहार संजय सावंत याने केलेला नाही. जागेच्या व्यवहारामध्ये कोणीही मध्यस्थ नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी जो चेक क्रमांक सांगितला आहे त्या चेकने माझ्या खात्यात कोणतेही पैसे जमा झालेले नाहीत. व्यवहाराच्या वेळेला मला दोन चेक दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या खात्यात अशा प्रकारचे कोणतेही चेक जमा नाहीत.

१४. दि. १३/०१/२०२३ रोजी त्या अर्ध्या तासामध्ये आरोपी क्र. २ हिला कोणाचेही फोन आले नव्हते व ती कोणाशीही बोलली नव्हती. मी शशिकांत टावरे याला आजपर्यंत ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी शशिकांत टावरेला घडलेली घटना कशी कळली याबाबत मी आरोपी क्र. १ व २ यांच्याकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: शशिकांत टावरेला भेटून विषय क्लीयर करण्याचा प्रयत्न केला नाही. असे घडले नाही की, पैसे देण्याआधी आरोपी क्र. १ संजय सावंत याने माझ्या मोबाईलमधील चॅट व फोटो डिलीट केले होते. माझा अॅन्ड्रॉइड फोन होता परंतु बॅक अप नव्हते.

१५. हे म्हणणे खरे आहे की, मी गुन्हा दाखल केला त्यावेळी माझ्याकडे कोणतेही फोटो व चॅट नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३/०१/२०२३ ते गुन्हा दाखल करेपर्यंत मी कोणालाही घटनेबाबत सांगितले नव्हते. हे मला माहिती नाही की, दि. १२/०२/२०२३ रोजी आरोपींना दुसऱ्या गुन्ह्यात अटक झाली होती व त्याच दिवशी त्यांना जामीन झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला सोनके साहेबांनी बोलावून घेतले होते व आरोपींविरुद्ध तक्रार देण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सोनके पोलीसांच्या सांगण्यावरुन मी झिराड येथे जावून तक्रार दिली होती.

१६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने मला बोलावून घेतले व आमच्यात शारीरिक संबंध झाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. २ ते ५ मधील मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठलेही पैसे संजय सावंत याला दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी तक्रार दाखल

केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.		( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०९/१०/२०२५**.		मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.